# नाशिक महानगरपालिका,नाशिक

**जाहिरात व परवाने विभाग**

राजीव गांधी भवन (मुख्यालय), शरणपुररोडनाशिक -४२२ ००२

## आगामी सार्वजनिक गणेशोत्सव - २०२४ निमित्त गणेशमुर्ती विक्री करीता खुल्या जागांची जाहिर लिलाव नोटीस

सार्वजनिक गणेशउत्सव - २०२४ करीता,नाशिक महानगरपालिकेच्या विभागनिहाय निश्चित केलेल्या खुल्या जागा(क्षेत्र १० X १० चौ.फुट आकारमानाचे स्टॉलकरीता निश्चित केलेली जागा) दि.०१/०९/२०२४ ते दि.०७/०९/२०२४ अखेर पावेतो,गणेशमुर्ती विक्री करीता मनपा अटी-शर्ती नुसार,खालील परिशिष्टात नमुद खुल्या जागांचा जाहिर लिलाव प्रक्रीया,संबंधित विभागीय अधिकारी यांचे नियंत्रणात (१) प्रथम लिलाव प्रक्रीया मंगळवार दि.२०/०८/२०२४ रोजी वेळ दु.०२.३० वा. (२) प्रथम लिलाव प्रक्रीयेतील प्रतिसाद न मिळालेल्या जागांकरीता व्दितीय लिलावप्रक्रीया गुरवार दि.२२/०८/२०२४ रोजी दु.०२.३० वा. आयोजित करणेत आली आहे.तरी इच्छुकांनी लिलावाच्या दिवशी वेळेत उपस्थित राहुन लिलाव अटी- शर्तीची पुर्तता करुन लिलावात सहभाग घेता येईल.

| अ.क्र | खुल्या जागेचे ठिकाण | एकुण स्टॉल संख्या | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | गोल्फ क्लब ईदगाह मैदान | १ ते ५० | मनापाचे विभागीय कार्यालय नाशिक पश्चिम नवीन पंडीत कॉलनी, नाशिक येथील सभागृहात(पहिला मजला) |
| २ | संदिप हॉटेल समोरील मोकळी जागा | १ ते १० | |
| ३ | शिवसत्य मैदान(माणिक नगर गंगापुर रोड) | १ ते ५ | |
| ४ | युनिक मैदानाशेजारी चेतनानगर राणेनगर कॉर्नर सर्व्हे नं ८८४/८८५ शारदा विद्यालय समोरील मोकळा भुखंड | १ ते १० | मनापाचे विभागीय कार्यालय नाशिक पुर्व दगडी इमारत मेनरोड,नाशिक येथील सभागृहात |
| ५ | साईनाथनगर सिग्नल भाजी मार्केट शेजारील जागा | १ | |
| ६ | इंदिरानगर उपकार्यालय,घरपट्टी | २ | |
| ७ | शिवाजीवाडी,भारत नगर समोर,पेट्रोल पंपाशेजारी मनपा जागेत | २ | |
| ८ | जेतवन नगर नर्सरीच्या बाजुला जॉगिंग ट्रॅकच्या आतीस बाजुस | १ ते १० | मनापाचे विभागीय कार्यालय नविन इमारत,दुर्गा गार्डन शेजारी, देवळाली, नाशिकरोड येथील सभागृहात |
| ९ | प्रेस समोर के एन केला शाळे शेजारील मनपा मोकळया जागेत | १ ते ३० | |
| १० | मनपा नाटयगृह आरक्षित जागेत जेलरोड नाशिकरोड | १ ते २८४ | |
| ११ | म्हसरुळ गावाजवळील वैदुवाडी बौद्धविहार जवळील मोकळया जागेत | १ ते २ | मनापाचे विभागीय कार्यालय पंचवटी,मखमलाबाद नाका, कै.पंडितराव खैरे इमारती मधील सभागृहात(दुसरा मजला) |
| १२ | आरटी ओ ऑफिस समोरील मोकळया जागेत पेठरोड पंचवटी | १ ते २ | |
| १३ | आडगाव एस टी स्टॅण्डजवळ मोकळया जागेत | १ | |
| १४ | जुने शॉपिंग सेंटर लेखा नगर पाठीमागे शिवाजीचौक भाजी मार्केट मोकळे मैदान | १ ते ६ | मनापाचे विभागीय कार्यालय नविन नाशिक,अंबड पोलिस स्टेशन समोर नाशिक |
| १५ | पवन नगर मिनी स्टेडीयम | १ ते १५ | |
| १६ | राजे संभाजी स्टेडीयम मैदान | १ ते १५ | |
| १७ | गामणे ग्राऊंड | १ ते ६ | |
| १८ | खंडेराव महाराज मंदिर भिंतीलगत सातपुर गाव | १ ते १० | मनापाचे विभागीय कार्यालय सातपुर येथील सभागृहात(पहिला मजला) |
| १९ | दत्तमंदिर रोड कॉर्नर अंबडलिंक रोड | १ ते २ | |
| २० | मांगल्या पेट्रोलपंप समोर सातपुर अंबड लिंकरोड | १ ते २ | |
| २१ | ध्रुवनगर बसस्टॉप सिद्धिसुपरमार्केट लगत | १ ते २ | |
| २२ | मोतीवाला कॉलेज समोर | १ ते २ | |

### अटी-शर्ती

१. सदर लिलावात भाग घेणा-यास प्रत्येक स्टॉलच्या जागेसाठी अनामत र.रु.५०००/- लिलावापुर्वी आगाऊ भरणे तसेच रहिवासी पुरावासह स्वत:चे ओळखपत्राची छायांकीत प्रत(२ प्रतीत)साक्षांकीत करुन सादर करावी लागेल(जसे आधारकार्ड/निवडणुक ओळखपत्र/वाहन परवाना/पॅनकार्ड/लाईटबील/बँक पासबुक)त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. यशस्वी लिलाव धारकांस प्राप्त स्टॉलच्या जागेची अंतिम लिलाव बोलीप्रमाणे निश्चित केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील शासनाचा वस्तु व सेवाकराची १८ टक्के इ. लिलाव प्रक्रीया संपुष्टात आल्यानंतर,त्याच दिवशी रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने(नावे नाशिक महानगरपालिका,नाशिक)भरणा करणे अनिवार्य आहे.त्याशिवाय जागेचा ताबा मिळणार नाही.

३. यशस्वी लिलाव धारकाने लिलाव अटी-शर्ती प्रमाणे लिलावाची रक्कम मुदतीत न भरल्यास,आगाऊ भरणा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येवुन सदरची जागा इतर मागणीधारकास वाटप करणेत येईल.

४. नाशिक महानगरपालिकेने उक्त परिशिष्ठात नमुद निश्चित केलेले ठिकाणे/जागा इ.मध्ये बदल करणे स्टॉलच्या जागेच्या संख्येत वाढ अथवा घट करणे.इ अधिकार राखुन ठेवल असुन त्यामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास सदर बदलानुसार तडतोड करणे यशस्वी लिलाव धारकावर बंधनकारक राहिल.

५. प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) पासुन मूर्ती निर्मिती, आयात, साठा बंदी बाबत शासन निर्णयाचे नियमांचे पालन करणे यशस्वी लिलावधारकास बंधनकारक राहिल.

६. यशस्वी लिलाव धारकाने स्वत: अग्निशमन विभागाकडून ना-हरकत दाखला प्राप्त करणे,अग्निशमन विभागाने निश्चित केलेल्या नियमाचे पालन करणे अनिवार्य आहे.तसेच विद्युत वितरण कंपनीकडुन विद्युत पुरवठा आवश्यक असल्यास स्वत:च्या नांवावर प्राप्त करणे व विद्युत नियमाचे पालन करणे बंधनकारक आहे.

७. जागेचा नकाशा नाशिक महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाचे "जाहिरात व परवाने विभागात" कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

८. लिलाव सुरु होणेपुर्वी सविस्तर अटी-शर्तीचे वाचन करण्यात येवुन लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

९. गणशोत्सव २०२४ निमित्त गणेशमूर्ती विक्रीचे तात्पुरते शेड/स्टॉल/गाळेची खुल्या जागेचे जागा लायसेन्स फी चे जाहिर लिलाव नोटीसमध्ये नमूद केलेल्या प्रत्येकी १० X १० चौ. फु. च्या खुल्या जागेचा ताबा दि.०१/०९/२०२४ ते दि. ०७/०९/२०२४ या कालावधीपुरता मर्यादीत राहील.

१०. लिलाव बोलीची किमान मर्यादा र. रु. १००/- या प्रमाणे असुन, त्यापटीने बोली लागेल व किमान ३ बोली नंतर लिलाव कायम करण्यात येईल.

११. एका व्यक्तिस/संस्थेस/गटास एकच जागा जाहिर लिलावात प्राप्त करता येईल.

१२. गणेशमूर्ती विक्रीचे शेड/स्टॉल/गाळेपासून कोणत्याही प्रकारे रहदारीस अडथळा येईल अशा प्रकारे उभारणी करता येणार नाही.

१३. सिमेंट क्रॉक्रीट/ डांबरी रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर तात्पुरते शेड/स्टॉल/गाळेसाठी खोदाई करण्यास परवानगी नाही, अशाठिकाणी तात्पुरते शेड/स्टॉल/गाळे उभारवयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर अथवा पर्यायी अशी मजबूत स्वरुपाची व्यवस्था करुन आवश्यक असणारे खांब रोवण्यात यावेत.

१४. यशस्वी लिलावधारकाने प्राप्त केलेल्या जागेचे संबंधीत विभागाचे विभागीय अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांचेकडुन रेखांकन करुन, त्यानुसार शेड/गाळा/स्टॉल ची उभारणी करणे अनिवार्य आहे.

१५. मा. न्यायालयाचे निर्देश, शासनाचे निर्देश/आदेश तसेच मा. जिल्हाधिकारी, नाशिक व मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर व नाशिक महानगरपालिका यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशाचे पालन करणे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक राहील.

१६. महाराष्ट्र शासनाने प्लास्टिक व थर्माकॉल वर बंदी असुन सदर नियमाचे पालन करणे अनिवार्य आहे.

१७. प्रत्येक स्टॉलच्या जागेचे क्षेत्र १० X १० चौ.फूट निश्चित केले आहेत, त्यापेक्षा जास्त क्षेत्रावर शेड/मंडप उभारणता येणार नाही अथवा खुल्या जागेचा व्यवसायाकरीता वापर करता येणार नाही.

१८. यशस्वी लिलावधारकाने जागे बाबत भरणा केलेली सुरक्षा अनामत मुदत संपल्यानंतर,जागा पुर्ववत स्वच्छ व जैसेथे करुन देणे बंधनकारक आहे.तद्नंतर अनामत रक्कम प्राप्त करणेकरीता मागणी अर्ज व त्या सोबत अनामत रक्कमेची मुळ पावती तसेच मनपाचे इतर थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केल्यानंतर, अनामत रक्कम अदायगी करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

१९. यशस्वी लिलावधारकाने प्राप्त केलेल्या जागेवर कुठल्याही प्रकारचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.

२०. यशस्वी लिलावधारका कडुन जागेचे काही नुकसान केल्याचे आढळुन आल्यास, सदर जागेच्या दुरुस्तीकामी येणारा खर्च मनपा निश्चित करेल, व त्यानुसार सदरचा खर्चाची भरपाई, मुदतीत भरणा करणे अनिवार्य राहील.

२१. नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणास्तव वित्त तसेच जिवीत हानी झाल्यास, त्याबाबतची कोणतीही जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

२२. यशस्वी लिलावधारकाने, गणेशमूर्ती विक्री व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करता येणार नाही.

२३. यशस्वी लिलावधारकाने, कायदा व सुव्यवस्था यांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

२४. यशस्वी लिलावधारकाने, गणेशमूर्ती विक्री करीता ठेवण्यात आलेला वस्तु/साहित्य इ. ची सुरक्षिततेची जबाबदारी स्व:ताची असुन, त्याकरीता आवश्यक त्या सुरक्षा बाबतच्या उपायोजना, स्वत: करणे अनिवार्य आहे. याबाबत काही दुर्घटना घडल्यास त्यास नाशिक महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

२५.यशस्वी लिलावधारकाने, मनपा मालकिच्या जागेचे कोणत्याही त-हेने हस्तांतर, पोटभाडेकरु, बक्षिस, गहाण, असाईनमेंट वगैरे करता येणार नाही. अगर गुडविलने जागा परस्पर दुस-यास बहाल करता येणार नाही. तसेच जागा संपूर्णपणे अगर अशंत: दुस-याच्या नावावर करुन देता येणार नाही. तसेच जागेत भागिदार घेता येणार नाही.

२६.यशस्वी लिलावधारकाने, जागेचा सर्व परिसर स्वच्छ ठेवणे व कचरा/निर्माल्य साफसफाई करुन तो एकत्र जमा केलेला कचरा/निर्माल्य घंटागाडीत टाकणे अनिवार्य आहे.

२७. यशस्वी लिलावधारकाने, प्राप्त केलेल्या जागेत व्यवसाय न केल्यास, भरणा केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील वस्तु व सेवा कर इ. लिलावधारकास परत अदा केली जाणार नाही.

सदर लिलाव मान्यकरणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे / जागांचा लिलाव तहकूब करणे, नविन अटी-शर्तींचा समावेश करणे इ. अधिकार नाशिक महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहेत. नाशिक मनपाने निश्चित केलेल्या उक्त नमुद अटी-शर्तीचे पालन करणे लिलावात भाग घेणारे / यशस्वी लिलावधारकांवर बंधनकारक आहे.

(श्रीकांत पवार)
उपआयुक्त (जापवि)
नाशिक महानगरपालिका, नाशिक